International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# जागतिकीकरण आणि आदिवासी समाज विकास

**डॉ. अनिल शिवाजी भुरके**
*इतिहास विभाग प्रमुख*
*रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय दारापूर ता. दर्यापूर जि. अमरावती*
*Corresponding Author –* *डॉ. अनिल शिवाजी भुरके*

**DOI - 10.5281/zenodo.15245304**

**प्रस्तावना :**

आदिवासींची सर्वात जास्त घणता असलेला देश म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. आज भारतात 365 आदिवासी जमाती आहेत. देशाच्या एकुण लोकसंख्येच्या 8.08 टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. आकडयात सांगायचे झाल्यास 10 कोटीच्या वर आदिवासी समाज या भूमीत राहतात. फार पूर्वीपासून आदिवासींचा विचार केला तर तेव्हा आदिवासींचा विकास झाला नव्हता. दऱ्याखोऱ्यात, पर्वतावर, पर्वताच्या पायथ्याशी, गिरी कंदारात वास्तव्य करणारा हा समाज असून आजही जागतिकीकरणाच्या युगात हा समाज युगानुयुगापासून आपले अस्तित्व टिकवून आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली या समाजाची स्वतंत्र स्वत:ची एक ओळख असून एक समाज व्यवस्था आहे. " प्रा. माधव सरकुंडे आपल्या 'आदिवासी अस्मितेचा शोध' या ग्रंथात म्हणतात की, आदिवासींने आपल्या हजारो वर्षाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीतून आपली आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे."[1] त्यामुळेच आज आदिवासी समाज प्रगत समाजाच्या संपर्कात येऊन आपली प्रगती साधली असून जागतिकीकरणाच्या माध्यमातून आदिवासी समाजाचा विकास होताना दिसून येते.

**जागतिकीकरण आणि आदिवासी समाजाचा विकास:**

भारताच्या संपूर्ण राज्यातील आदिवासी समाजावर या जागतिकीकरणाचा प्रभाव पुढील प्रमाणे पडलेला दिसून येतो.

**1) जागतिकीकरण व सामाजिक विकास:**

"आदिवासी समाजामध्ये रुढी, प्रथा, परंपरांना फारच महत्त्व आहे. किंबहूना असे म्हणता येईल संकलितरित्या या सर्व रुढी, प्रथा, परंपरा या समाजाचे संविधानच होय."[2] या संदर्भावरु असे लक्षात येते की आदिवासी समाजात चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारच्या प्रथा होत्या. जागतिकीकरण झालामुळे आदिवासींचा संपर्क शहरांशी येऊ लागला. त्यामुळे आदिवासी समाजात सामाजिक सुधारणा होतांना दिसून आला व त्यांच्यात सामाजिक बदल झाला. पूर्वी हा समाज सुशिक्षित नसल्यामुळे त्यांच्यात सामाजिक विकास झाला नव्हता परंतू आज जागतिकीकरणामुळे शिक्षणात भर पडून आदिवासी समाज ही शिक्षणाचे धडे घेऊ लागला. परिणामी आदिवासी समाजात बालविवाह पद्धती संपूष्टात येऊन मुलामुलींचे लग्न 18 ते 21 या वयोगटात होतांना दिसून येते. तसेच पूर्वी आदिवसींची घरे ही कुडाची असत परंतू आज घरकुल योजनेमुळे आदिवासींच्या सामाजिक विकासात भर पडली आहे. तसेच केंद्र स्तरापासून तर राज्यस्तरापर्यंत विकास योजनामुळे आदिवसींच्या सामाजिक विकासात भर पडली आहे.

पूर्वी आदिवासी समाजात वधु मूल्य (हुंडा) म्हणून गाई किंवा इतर वस्तू स्वरुपात घेतले जात असत परंतू आज मात्र पैसाच्या स्वरुपात घेतांना दिसून येते. जागतिकीकरणामुळे समाजात प्रगती झाली पण पूर्ण:ता वधु मूल्य यावर आळा बसला नसला तरी आदिवासी समाजातील आदिवासी संघटना हुंडा प्रतिबंधक व्हावा म्हणून प्रहार करतांना दिसून येत आहे. आदिवासी स्त्रीला पुरुषा इतकेच महत्त्व आहे. आदिवासी स्त्रीचा घटस्फोट झाला असेल किंवा स्त्रीचा पती मरण पावला असेल तर तिला पुनर्विवाह करण्याचा आधिकार आहे. हिंदू स्त्रियांप्रमाणे देवदासी, सती प्रथा आदिवासी समाजात दिसून येत नाही.

**2) जागतिकीकरण व शैक्षणिक विकास:**

पूर्वी आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. "भारतातील शिक्षणाचा पाया 1882 मध्ये इंडियन एज्युकेशन कमिशनच्या स्थापनेनतंर घातला गेला. इ.स. 1882-1920 हा पहिला टप्पा तर इ.स. 1921 नतंरचा दुसरा टप्पा मानला जातो. डे स्कुल, बोर्डिंग स्कुल, आणि आश्रमशाळा अशा तिन प्रकारच्या शैक्षणिक संस्था अस्तित्वात आल्या. तर इ.स. 1982 मध्ये गुजरातमधील भिल्लाच्या मीराखेडी या गावात पहिली आश्रमशाळा सुरु झाली."[3] येथुन पुढे आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम सुरु झाले होते. "इ.स. 1991 मध्ये जनगणनेनुसार भारताच्या लोकसंख्येचे साक्षरतेचे प्रमाण 52.21 टक्के असून त्यात आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण 29.60 टक्के होते. महाराष्ट्रात इ.स. 1961 मध्ये आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण 7.21 टक्के, इ.स. 1971 मध्ये 11.24 टक्के, इ.स. 1981 मध्ये 22.29 टक्के, इ.स. 1991 मध्ये 36.77 टक्के, 2001 मध्ये 52.02 टक्के, होते."[4] एकदरित आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण हे वाढत गेलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहु महाराज, महात्मा जोतिबा फुले, महर्षी पंजाबराव देशमुख, यांच्या सामाजिक व राजकीय आणि शैक्षणिक कार्यामुळे दलित समाजातील मुला मुलींना शिक्षणाचे धडे मिळू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय राज्य घटनेत शिक्षणाचा मुलभूत अधिकार मिळवून दिल्यामुळे आदिवासी समाजातील मुले शिक्षणाचे धडे घेऊ लागले. आजतागायत जागतिकीकरणामुळे शिक्षणात मोठा बदल झाला आहे. यांचा फायदा आदिवासी समाजाने घेतला आहे. त्यामुळेच आदिवासी समाजातील तरुण शिक्षण घेऊन प्रशासकीय आधिकारी बनून समाजाचे नेतृत्व करत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकीसारखे शिक्षण घेत आहे. आज संगणकाचे नवे युग पुढे येत आहे, आय. आय. टी सारख्या नवीन ज्ञानशाखा येत आहे त्यामुळे जागतिकीकरणमुळे शैक्षणिक विकास होऊन आदिवासी समाज प्रगत समाजाच्या बरोबरीने पावले टाकतांना दिसून येत आहे. आज ग्रामिण भागापासून तर शहरांपर्यंत आदिवासी समाज शैक्षणिक विकासात प्रगती करीत आहे. हा बदल जागतिकीकरणमुळे शक्य झाला आहे.

**3) जागतिकीकरण व सांस्कृतिक आणि धार्मिक विकास:**

जागतिकरणामुळे सर्वच समाजाचा विकास झाला त्यात आदिवासी समाज ही अपवाद नाही. " शेषराव मडावी आपल्या आदिवासी भारताचा प्राचीन व आर्वाचिन इतिहास या शोध ग्रंथात म्हणतात की, इ.स. पूर्व ते 20 व्या शतकापर्यत भारतात अनेक महासत्ता अस्तित्वात होत्या. त्या कालावधित त्यांनी परकियांशी संघर्ष करुन आपल्या स्वराज्याचा शिकामोर्तब केला व आपल्या देशाचा अभिमान बाळगला. त्यात त्यांनी अनेक वास्तुचे बांधकाम केले. ते त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचा व राज्यकारभाराचा जीता जागता नमुना आहे. त्यात अप्रतिम गढ, किल्ले, महाल, तलाव, समाधी, विहिर, मंदिरे, परकोट या सारख्या अनेक पुरातन वास्तु निर्मिती करुन तो अमूल्य ठेवा पुढील पिढीला हस्तांतरित केला आहे."[5] जागतिकीकरणामुळे आदिवासी समाजानी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन घेतले आहे. त्यामुळेच आदिवासी समाजात सांस्कृतिक आणि धार्मिकदृष्टया विकास झालेला दिसून येतो. प्राचीन काळापासून

आदिवासींची सांस्कृतिक परंपरा अतिशय सुदंर आहे. मग आदिवासींची नृत्यकला, नाट्यकला, संगीत, असो अथवा सण, उत्सव असो ती आजतागायत टिकवून आहे. तसेच धार्मिक दृष्टिकोनातून विचार करता प्राचीन काळापासून आदिवासी समाजात आंधश्रध्दा दिसून येते. त्यामुळेच आदिवासी समाज भूते खेते, भानामती, जादू टोणा यावर विश्ववास ठेवतो. अतिदुर्गम भागातील आदिवासींचा विचार करता आजही ते आंधश्रध्देवर विश्वास ठेवतात. परंतू जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी समाजानी शिक्षणाचे औचित्य साधल्यामुळे आंधश्रध्देवर बऱ्याच प्रमाणात आळा बसत आहे. जागतिकीकरणामुळे मोठ मोठे रुग्णालय बांधले असून वैद्यकीय सुख सुविधा मिळत आहे. यांचा फायदा आदिवासी समाज घेतांना दिसून येत आहे.

**4) जागतिकीकरण व आर्थिक विकास:**

"प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ हरस्कोव्हिट्स यांनी आदिवासींच्या विविध आर्थिक क्रियांची नोंद केली आहे. त्यानुसार अन्नसंकलन, शिकार, मासेमारी, पशुपालन, शेती, आणि हस्तकला या अर्थव्यवस्थेशी निगडीत अवस्था किंवा क्रिया आहेत."[6] या संदर्भावरुन असे लक्षात येते की, आदिवासी समाजाचा आर्थिक विकास झालेला आहे. आदिवासींची हस्तकला संपूर्ण देशात पोहचली आहे. व आदिवासींच्या हस्तकलेला देश विदेशात मोठया प्रमाणात मागणी आहे. जागतिकीकरणामुळे भारताचा आर्थिक विकास झाला आहे. आज संपूर्ण राज्यात औद्योगिकीकरण झाले आहे. त्यामुळे कामगार वर्ग निर्माण झाला आहे. व हा कामगार वर्ग कंपनीत काम करतो. यातच आदिवासी समाज सुद्धा कंपनीत काम करतांना दिसून येते. तसेच जागतिकीकरणामुळे वाहतुक मार्ग झाल्यामुळे शेतीमाल शहरांपर्यंत सहज ने आण करता येऊ लागल्यामुळे ज्या आदिवासी समाजाकडे शेती आहे त्यांच्या आर्थिक विकासात भर पडली आहे. तसेच जागतिकीकरणामुळे नव नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे आदिवासी समाजही काही प्रमाणात शेती व्यवसायात या तंत्रज्ञानाचा वापर करतांना दिसून येते. आज शेती ही ट्रॅक्टरच्या माध्यमातून करीत असल्यामुळे वेळेची बचत होऊन उत्पन्न वाढवितांना दिसून येते. तसेच जो आदिवासी समाज रोजमजुरी करतो त्यांचे मात्र हाल होताना दिसून येते. कारण सावकार लोक त्यांना पाहिजे त्या प्रमाणात व वेळेवर कामाचा मोबदला देतांना दिसून येते नाही. यवतमाळ जिल्ह्यात वणी, घाटंजी, केळापूर, राळेगांव या तालुक्यात मोह फुलांपासून विविध खाद्यपदार्थ तयार करुन बाजारात विक्री करतांना दिसून येते. या खाद्यपदार्थाला विशेष मागणी असून आदिवासी महिला बचत गट तयार करुन मोह फुलांपासून विविध बर्फी मिठाई तयार करतांना दिसून येत आहे.

**5) जागतिकीकरण व राजकीय विकास:**

प्राचीन काळात आदिवासींची राजकीय प्रणाली मर्यादित होती; आजच्या सारखी प्रगत नव्हती. होती ती आदिवासी कबील्यापूरती मर्यादित होती. "दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या रुपाने जसा सक्षम नेता मिळाला तसा आदिवासी समाजाला मिळाला नाही. त्यामुळे आदिवासी समाज पूर्वी भरकटत गेला होता. इ.स. 1930 दरम्यान ठक्कर बाप्पा आदिवासींचे नेते असल्याचे चित्र रंगवले होते. परंतू त्यांना काहि मर्यादा आल्या आणि त्यांचे नेतृत्व मागे पडले."[7] परंतू आज जागतिकीकरणामुळे आदिवासींना राजकारणाचे धडे मिळू लागले व डॉ बाबासाहेब आंबेडकरामुळे संविधानात आदिवासींना राखीव मतदारसंघ मिळाल्यामुळे राजकीय क्षेत्रात कार्य करण्याची संधी मिळाली. आज मोठ्या प्रमाणात आदिवासी संघटना कार्यरत असून आदिवासी समाजाच्या समस्या सोडवितांना दिसून येते. आदिवासी समाजात राजकीय पुढारी लोकसभा व राज्यसभेत आदिवासी समाजाचे नेतृत्व करीत आहे. त्यामुळे आदिवासी समाज राकीयदृष्टया हळूहळू का असेना राजकारणात सहभागी होत आहे. ग्रामपंचयात पासून तर पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हापरिषद ते लोकसभा व राज्यसभेपर्यंत आदिवासी समाज राजकारणात सक्रिय आहे. त्यांचे

उदाहरण म्हणजे माजीमंत्री मा. श्री. मधूकरराव पिचड, माजीमंत्री मा. श्री. विष्णू सावरा, मा. श्री. नरहरी झिरवाळ, डॉ. सतिष पाचपुते, यवतमाळ जिल्ह्यातील माजी सामाजिक न्याय व परिवहन मंत्री मा. ॲड. शिवाजीराव मोघे, माजी शिक्षणमंत्री मा. प्रा. वंसतराव पुरके, डॉ. संदिप धुर्वे, प्राचार्य डॉ. अशोक उईके, मा. श्री. राजू तोडसाम, माजी आमदार मा श्री. उत्तमराव इंगळे इत्यादी. त्यामुळे राजकीय विकासात आदिवासी समाज स्वता:ला झोकुण देतांना दिसून येत आहे.

**जागतिकीकरणामुळे आदिवासी समाजावर झालेला दुष्परिणाम :**

जागतिकीकरण हे विकासात्मक धोरण असले तरी या धोरणामुळे काही समाजाला या जागतिकीकरणाचा धोकाही असतो. त्यातच आदिवासी समाज होरपळतांना दिसून येते. त्यामुळे जागतिकीकरणाचे फायदे जसे झाले तसेच काही दुष्परिणाम सुद्धा झाले आहे ते पुढील प्रमाणे सांगता येईल...

**1) जल जंगल व जमीन हक्क संपूष्टात:**

जागतिकीकरणात विकास होत असला तरी एकीकडे मात्र आदिवासींच्या जल, जंगल, व जमीन हक्कावर गदारोळ होत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे छत्तीसगढमधील सरगुजा जिल्ह्यातील हसदेव जंगल होय. या जंगलाला मध्य भारताचं फुफ्फुस म्हणून संबोधलं जात. हसदेव नदीच्या काठावर एक लाख 70 हजार हेक्टर क्षेत्रात हा वनपटा पसरलेला आहे. गोंड, ओरांव, आणि इतर विविध आदिवासी जमातींतील 10 हजार आदिवासी या वनविभागात राहतात. त्यांची उपजीविका जंगलाच्या औषधी वनस्पती आणि अन्य वनसंपदेवर आधारित आहे. इथल्या जल, जंगल, जमिनीवर आदिवासींचा हक्क आहे. परंतू वीज निर्मितीसाठी कोळसा हवा म्हणून इथली झाडे तोडून दगडी कोळसा शासन मिळवत आहे. आदिवासी समुदाय या हसदेव जंगल वाचविण्यासाठी प्रयत्न करित आहे. परंतू या आदिवासी जमातीवर पोलिस प्रशासन दडपन टाकुण जंगल तोड करतांना दिसून येत आहे. त्यामुळे येथील आदिवासी समाजावर अन्याय आत्यांचार होत आहे.

**2) आदिवासींच्या जमिनी भांडवलशाहीना हस्तातंरण:**

जागतिकीकरणामुळे भारताचा विकास तर होत आहे. परंतू त्याचबरोबर आदिवासी समाजाच्या जमिनी शासन भांडवलशाहीच्या स्वाधिन करत आहे. यांचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील काही आदिवासी गांवाचे त्यांच्या राहत्या ठिकाणावरुन स्थंलात्तर करत आहे. त्यामुळे नवीन ठिकाणी जाऊन राहणे त्यांना कठीन जात आहे. व त्यांच्या जमिनी ह्या भांडवलदारांना कंपन्या उभारण्यासाठी देत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत आहे.

**3) आदिवासींची भंटकंती सुरु:**

जागतिकीकरण, शहरीकरण यामुळे आदिवासींचे घरे उद्धवस्त करुन तिथे मोठ मोठे महामार्ग बनविणे चालु आहे. त्यामुळे तेथील आदिवासींचे घरे मोड तोड करुन राष्ट्रीय महामार्ग बनविणे सुरु झाल्यामुळे त्यांना इतरत्र भटकावे लागत आहे. तसेच जागतिकरणमुळे ग्रामिण भागातील छोटे मोठे व्यवसाय हळु हळु बंद पडू लागले. कारण जागतिकीकरणामुळे बाजारात नवनवीन वस्तु मिळत असल्यामुळे आदिवासींच्या वन उत्पादन मालाला योग्य ते भाव मिळत नाही. त्यामुळे शहरांकडे आदिवासींची धाव दिसत आहे.

**4) आदिवासीवर अन्याय अत्याचार:**

जागतिकीकरण झाल्यामुळे नव नवीन तंत्रज्ञानात भर पडली आहे. भारतीय संविधानाच्या चौकटीत राहून समाजवादी अर्थ व्यवस्थेचा अवलंब करुन धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न भारत देश पाहु लागला. भारतातील आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी वाढतच गेली. कारखानदार व भांडवलदार गब्बर झाले. सरकारनेही त्यांच्या सोईचेच कायदे कानून तयार केले. यात सर्वात जास्त गोष्टीचा फटका भारतातील आदिवासींना बसला आहे. तसेच आधुनिक

भारतातील नव्या कायद्यांनी आदिवासी माणसाच्या उदरनिर्वाहाची त्रयी जल, जंगल, जमीन हिसकावून घेतली. त्यामुळे आदिवासींचे सारे विश्वच विसकटून गेले. हे सारे करीत असतांना सावकारा, भांडवलदाराबरोबर शासनही आदिवासींवर अन्याय अत्याचार करुन जमिनी हिसकावून घेत आहे.

**5) बोगस आदिवासींची घुसखोरी:**

आदिवासी समाजाचा विकास व्हावा म्हणून त्यांना आरक्षण दिले गेले. आदिवासी समाज हा अशिक्षित असल्यामुळे त्यांनी आरक्षणाचा पाहिजे तितका फादया घेतला नव्हता. त्यामुळे बिगर आदिवासींना आदिवासींच्या आरक्षणाचे वेड लागुण ते बळकविण्याचे प्रयत्न सुरु झाले. जागतिकीकरण तर झाले परंतू या जगतिकीकरणाच्या धुमाकुळीत आदिवासी मध्ये खोटे कागदपत्रे बनवून अनेक आदिवासींच्या नोकऱ्या या बोगस आदिवासींनी घेतल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातींच्या पदावर बोगस आदिवासी नोकऱ्या करित आहेत. त्यांना अधिसंख्या करुन तिथे खऱ्या आदिवासींना नोकरी दिल्या जात नाही. "राज्यात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिताच्या स्थापनेपासून नोव्हेंबर 2023 पर्यंत 7 लाख 11 हजार 652 दावे दाखल केले होते. यापैकी 6 लाख 26 हजार 200 जात प्रमाणपत्र वैध ठरले. तर 37 हजार 599 जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहेत. नंतर इतर कारणानी निकाली काढलेले प्रकरणाची संख्या 30 हजार 700 असून 17 हजार 102 दाव्याची प्रकरणे प्रलंबीत आहे. असे खोटे प्रमाणपत्र बनवून जवपास 12,500 पदांवर बोगस आदिवासींची घुसखोरी झालेली आहे."[8] हा सर्वात मोठा प्रश्न खऱ्या आदिवासी समाजासमोर आ वासून पडलेला आहे.

**निष्कर्ष:**

मागील शतकाच्या शेवटच्या चरणात जागतिकीकरणाचा आरंभ झाला. मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण रुजवू पाहणाऱ्या भांडवली देशांनी या नव्या बदलाचा पुरेपूर फायदा घेतला. अनेक देशांनी या पाश्वभूमीवर आपल्या अर्थनीतीत व विदेश नितीत मूलभूत बदल घडवून आणले. या बाबतीत भारतदेश सुद्धा मागे राहिला नाही. भारताने अनेक क्षेत्रात धोरणात्मक बदलाची भूमीका स्वीकारली ' राष्ट्रीय विकासाचा दर कसा वाढेल' हा विचार केंद्रस्थानी ठेवूनच सर्व धोरणाची निर्तिती होऊ लागली. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कालावधीत भारतात संगणक युगाचा आरंभ झाला. संगणकाबरोबरच इंटरनेट यंत्रणा सक्रिय झाली. भारताचा अनेक क्षेत्रात विकास झाला. भारत देश हा कृषी प्रधान देश असून कृषी विकास झाला आहे. त्यामुळे भारतीय आदिवासींचा सुद्धा जागतिकीकरणाच्या वाटयात विकास होत आहे. त्याबरोबर काही आदिवासींची अधोगतीकडे वाटचाल होत आहे. हे तितकेच सत्य आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**


1) सरकुंडे प्रा. माधव - आदिवासी अस्मितेचा शोध , प्रकाशक देयानी प्रकाशन, चाणक्य नगरी, खदवे ले आऊट वाघापूर यवतमाळ, प्रथमावृत्ती 2011 प.क्र. 09
2) कित्ता पृ.क्र. 56
3) कुलकर्णी डॉ. शौनक- महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे प्रथमावृत्ती 2009 पृ.क्र. 91
4) खोडेवाड डॉ. देविदास- महाराष्ट्रातील आदिवासी जीवन, प्रकाशन श्री. शशिकांत पिंपळापूरे विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद पृ. क्र. 87
5) मडावी शेषराव एन.- आदिवासी भारताचा प्राचीन व आर्वाचिन इतिहास, सुधीर प्रकाशन, गणेश नगर, वर्धा प्रथमावृत्ती 2011 पृ. क्र. 07
6) कुलकर्णी डॉ. शौनक, पूर्वोक्त पृ.क्र. 79
7) सरकुंडे प्रा. माधव, पूर्वोक्त पृ.क्र. 19)
8) देशोन्नती दिनांक 3 डिसेंबर 2022 पृ. क्र. 01